

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ४७ • मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

'गोकुळ'च्या सत्तेवर महायुतीचा झेंडा;राजेश पाटील अध्यक्षपदी!



कोल्हापूर:संपुर्ण राज्य आणि देशाचे लक्ष लागुन असलेल्या कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या अध्यक्षपदाची पंधरा दिवसांपासून सुरू असलेली राजकीय कोंडी अखेर फुटली. महायुतीने अध्यक्षपदावर दावा सांगत राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आ. राजेश पाटील यांची अध्यक्षपदी निवड केली. निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडणूक प्रक्रियेत राजेश पाटील यांनी काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे उमेदवार शशिकांत पाटील-चुयेकर यांच्यावर मात केली. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहून आज ही निवडणूक घेण्यात आली होती. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.

गोकुळ दूध संघाच्या २५ जागांसाठी १८ ऑक्टोबर रोजी मतदान झाले होते. १९ ऑक्टोबरला जाहीर झालेल्या निकालात सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने १३ जागा जिंकत आघाडी घेतली होती, तर महायुतीप्रणित छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीला १२ जागा मिळाल्या होत्या. अध्यक्ष निवडीसाठी झालेल्या पहिल्या सभेत आवश्यक १४ संचालकांचा कोरम पूर्ण झाला नव्हता. समविचारी आघाडीचे १३ संचालक उपस्थित राहिल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सभा तहकूब केली होती. त्यानंतर महायुतीने शासननियुक्त संचालकांच्या नियुक्तीचा मुद्दा पुढे आणत अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे राजकीय गणित बदलण्याचा प्रयत्न केला. शासननियुक्त चार संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याच्या निर्णयाला सतेज पाटील गटाने तीव्र विरोध दर्शविला. शासननियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देण्याच्या मुद्द्यावरून औरंगाबाद खंडपीठाने १० नोव्हेंबर रोजी नियोजित कार्यक्रमानुसार अध्यक्षपदाची निवडणूक घेण्याचे आदेश दिले. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया अंतिम निकालाच्या अधीन राहून पार पाडण्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले होते. दरम्यान, निवडणुकीपूर्वी समविचारी आघाडीने शासननियुक्त चार नामनिर्देशित संचालकांना मतदानाचा अधिकार देण्यास आक्षेप घेत निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगुले यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती. १३ संचालकांचे स्पष्ट बहुमत असतानाही शासननियुक्त संचालकांच्या मतदानामुळे सत्तेचे गणित बदलत असल्याचा आघाडीचा आक्षेप होता. अखेर आज झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत समविचारी आघाडीकडून शशिकांत पाटील-चुयेकर, तर महायुतीकडून माजी आमदार राजेश पाटील यांनी उमेदवारी दाखल केली. निवडून आलेल्या २५ संचालकांसह शासननियुक्त चार संचालकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. या निवडणुकीत राजेश पाटील यांचा विजय झाल्याने गोकुळच्या अध्यक्षपदावर महायुतीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने परिसरात सुमारे ६०० पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता. पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय संघर्षानंतर राजेश पाटील यांच्या निवडीने गोकुळमधील सत्तासंघर्षाला तूर्तास पूर्णविराम मिळाला आहे. मात्र, शासननियुक्त संचालकांच्या मतदानाच्या अधिकाराबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्याने या निवडीवर पुढे काय निर्णय होतो, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

दिलीपसिंघ सोढी यांच्या मार्केटसह घराला आग;लाखोंचे नुकसान

नांदेड/प्रतिनिधी-सोमवारी रात्री उशिरा माजी नगरसेवक आणी सेवाभावी व्यक्तिमत्व स. दिलीपसिंघ सोढ़ी यांच्या मार्केट आणी घराला अचानकपणे मोठी आग लागली. या आगीत लाखो रुपयांचे सामान, दागिने, कपडे, फर्नीचर आणी मौल्यावान वस्तु जळून ख़ाक झाले. अग्निशमन दलाने दोन तासांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली.



घटनेची माहिती अशी की, दिलीपसिंघ सोढ़ी आणी त्यांच्या कुटुंबीयांनी सोमवारी रात्री अंदाजे साडेनऊ ते दहा वाजता सुमारास दीवाळी हल्ला महल्ला मिरवणूकीची आरती केली. नंतर दिलीपसिंघ सोढी हे आपल्या मार्केटच्या पहिल्या माळ्यावर असलेल्या घरात जावून झोपी गेले. रात्री अकराच्या सुमारास अचानकपणे तळमजल्या वरील सोढी कडा शॉप या दुकानाला आग लागल्याचे निदर्शनास आले. दुकानातून मोठे धुर उठू लागले. वरील घटना गुरुद्वारा चौरस्ता ठिकाणी बंदोबस्तात तैनात पोलीस कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आली. त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी अग्निशमन दलाला सूचना दिल्या गेल्या. पोलिसांनी मार्केटच्या वरच्या मजल्यावर झोपलेल्या सर्वांना जागे केले. दिलीपसिंघ सोढी सुद्धा झोपेत होते पण आवाज आल्यामुळे ते उठून बाहेर आले. ज्या ठिकाणी झोपले होते त्याच ठिकाणी खालून वर पर्यंत अचनाकपणे आगेचा मोठा भडका उडाला. आगीने रौद्ररूप धारण करुन दूकानात व बाजूच्या दुकानात ड्रेसेस आणी कपडे होते. त्यामुळे आगीने मोठा पेट घेतला. अग्निशमन दल आणी सेवाभावी नागरिकांनी तसेच वजीराबाद पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. दमकलाच्या पाण्याच्या चार गाड्याना यावेळी पाचारित करण्यात आले होते. वरील घटनेत सोढी यांच्या घराचे संपूर्ण सामान, कपडे, राशन, दागिने, फर्नीचर जळून खाक झाले. अगदी त्यांना घालण्यासाठी कपडे देखील राहिलेले नाही. नुकसानीचा खरा आकडा पुढे आला नसला तरी जवळपास ४० लाख रुपयांचे नुकसान झाले असावे असा अंदाज वर्तविल्या जात आहे. सदरील घटना फटाक्यामुळे झाले की शार्टसर्किटमुळे त्याचे कारण स्पष्ट होऊ शकले नाही. वज़ीराबाद पोलिसांचा पंचनामा व तहसीलदाराचा पंचनामा झाल्यानंतर घटनेचे कारण पुढे येऊ शकते. पण या घटने माजी नगरसेवक दिलीपसिंघ सोढी हे सुदैवाने वाचले आहे. दो-तीन मिनिटाच्या आतच त्यांचे जिव वाचले अशी चर्चा आहे. आपात परिस्थितीत लोकांना रात्री बे रात्री मदतीसाठी धवून येणारा कार्यकर्ता म्हणून दिलीपसिंघ सोढी यांची खरी ओळख आहे. पूर परिस्थिती किंवा सुखा-दुःखात सोढी नेहमी धावून जातात. आज देखील ते दिवाळी पहाट कार्यक्रमात सकाळी नाश्ता वाटपाची सेवा करणार होते. पण अचानकपणे त्यांच्यावर हा संकट कोसळला.

आ.राजेश पवार यांनी सावरखेड येथे शेतमजुराच्या कुटुंबासमवेत साजरी केली दिवाळी

नायगाव/प्रतिनिधी-दिवाळीच्या आनंदात समाजातील दुःखग्रस्त कुटुंबांनाही सामावून घेण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आ.राजेश पवार यांनी सावरखेड येथील गायकवाड कुटुंबासोबत दिवाळी साजरी केली. विशेष म्हणजे, पत्नी सौ. पुनमताई राजेश पवार यांच्यावर मुंबई येथे कर्करोगाचे उपचार सुरू असतानाही त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत दुःखग्रस्त कुटुंबाला आधार दिला.

सावरखेड येथील भूमिहीन शेतमजूर अनुरथ नामदेव गायकवाड आणि नंदाबाई गायकवाड यांच्या अवघ्या २२ वर्षीय एकुलत्या एक मुलाचा, ऋषिकेशचा तेलंगणातील अरमूर येथून परतताना झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. ९ नोव्हेंबर रोजी मुंबईहून नांदेडला परतल्यानंतर आमदार पवार यांनी कोणतीही पूर्वप्रसिद्धी न करता थेट सावरखेड गाठले. कुटुंबीयांची विचारपूस करून त्यांना धीर दिला. यावेळी ५१ हजार रुपयांची आर्थिक मदत, नवीन कपडे, दिवाळीचा फराळ व भेटवस्तू देण्यात आल्या. विशेष म्हणजे, त्यांनी कुटुंबासोबत खाली बसून भोजनही केले. पत्नीच्या उपचारांची चिंता आणि स्वतःच्या कौटुंबिक संकटाच्या पार्श्वभूमीवरही दुसऱ्यांच्या दुःखात सहभागी होण्याचा आ.पवार यांचा हा प्रयत्न सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडविणारा ठरला. मदत करताना कुटुंबाचा स्वाभिमान जपण्याला त्यांनी प्राधान्य दिले.'या कुटुंबाने एकुलता एक मुलगा गमावला आहे. त्यांच्या वेदनेची कल्पनाही करता येणार नाही. त्यांना आपण एकटे नाही, हा विश्वास देण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या चेहऱ्यावर दिलासा आणता आला, हीच माझ्यासाठी खरी दिवाळी आहे,' अशी भावना आ.राजेश पवार यांनी व्यक्त केली.



पत्रकार गणेश कस्तुरे पंचतत्त्वात विलीन

नांदेड/प्रतिनिधी-पत्रकार तथा शिक्षक गणेश कस्तुरे (वय ५३) यांचे सोमवारी रात्री साडेदहा वाजता दीर्घ आजाराने उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता आणि शिक्षण क्षेत्रात शोककळा पसरली आहे. मंगळवारी दुपारी गोवर्धन घाट येथील वैकुंठधाममध्ये शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

गणेश कस्तुरे हे गेल्या ३३ वर्षांपासून स्वामी रामानंद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते.



अध्यापनाच्या क्षेत्रात योगदान देतानाच त्यांनी पत्रकारितेतही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. सामना, मराठवाडा, गावकरी, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स आदी नामांकित वृत्तपत्रांसाठी त्यांनी बातमीदार म्हणून काम केले. गुन्हेगारी, राजकीय, सामाजिक तसेच विकासात्मक विषयांवर त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रभावीपणे प्रकाश टाकला. निर्भीड आणि अभ्यासपूर्ण पत्रकारितेमुळे त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला होता.गेल्या काही दिवसांपासून ते आजाराने ग्रस्त होते. अखेर सोमवारी रात्री उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुले, भाऊ असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी *पान ४ वर*

जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यातील मौजे शिरजखोड शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर सोमवारी सायंकाळी पोलीसांनी धाड टाकुन सहा जणांना अटक केली.

मौजे शिरजखोड शिवारातील एका शेतात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती धर्माबाद पोलीसांना मिळाली. सोमवारी सायंकाळी पोलीसाच्या पथकाने जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना अख्तरअली खासीमअली सय्यद (वय २७) रा.शिरजखोड, शेषेराव रामलू रेगोटे (वय ४५) रा. बामणी थर्डी, सय्यद अनवर अली उलयाद अली, गंगाधर पिराजी साखरे व इतर दोन जणांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम, दोन दुचाकी असा २ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. पोलीस शिपाई सतीश तलवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





अजब न्याय!

कोल्हापूरच्या राजकारणात गोकुळ दूध संघाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ हा केवळ दूध उत्पादकांचा संघ नसून जिल्ह्याच्या राजकारणातील सत्तेचे एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते. त्यामुळेच कोल्हापूर परिसरात आमदारकी नको, पण गोकुळचे संचालकपद द्या, अशी मागणी राजकीय मंडळींकडून केली जाते, अशी चर्चा आहे. एवढ्या महत्त्वाच्या संस्थेची निवडणूक राजकीय संघर्षाशिवाय पार पडेल, अशी अपेक्षा करणेच चुकीचे ठरेल. यंदाची निवडणूक तर सत्ताधारी महायुती विरुद्ध सर्व विरोधी पक्षांची आघाडी अशा थेट संघर्षामुळे चांगलीच गाजली. मात्र, या निवडणुकीतून लोकशाही, सहकार आणि न्यायव्यवस्थेसमोर काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. पराभव पचवणे हे राजकारणातील मोठे आव्हान असते. मात्र, पूर्वीच्या राजकारणात पराभव स्वीकारण्याची आणि विरोधकांचे यश मान्य करण्याची राजकीय संस्कृती होती. अलीकडच्या काळात विशेषतः २०१४ नंतर राजकारणाचे स्वरूप बदलले आहे. ईडी, सीबीआय, प्राप्तिकर विभाग यांसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर करून विरोधी पक्षांतील नेत्यांना दबावाखाली आणणे आणि त्यांना सत्ताधारी पक्षात सामावून घेण्याचे प्रकार सातत्याने घडत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. अशा वातावरणात गोकुळच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना धक्का बसणे ही निश्चितच महत्त्वाची राजकीय घटना ठरली.स्थानिक आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी तीन-चार मंत्र्यांच्या राजकीय ताकदीला आव्हान देत २५ पैकी १३ जागांवर विजय मिळवला, तर सत्ताधारी आघाडीला १२ जागांवर समाधान मानावे लागले. संख्याबळाच्या दृष्टीने विरोधी आघाडीने बाजी मारली. मात्र, विजय मिळूनही सत्तेचा मार्ग सुकर झाला नाही. गोकुळच्या उपविधीनुसार सर्वसाधारण सभेसाठी किमान १४ संचालकांची उपस्थिती आवश्यक असल्याचे सांगितले जाते. नवनिर्वाचित १३ संचालक उपस्थित राहण्यास तयार असताना उर्वरित १२ संचालकांनी अनुपस्थित राहण्याचा पवित्रा घेतल्याने पहिलीच सर्वसाधारण सभा होऊ शकली नाही. निवडून आलेल्या संचालकांची संस्थेचा कारभार सुरळीत चालवण्याची जबाबदारी असताना सभेला अनुपस्थित राहून संस्थेचे कामकाजच ठप्प करण्याचा हा प्रकार सहकाराच्या मूलभूत तत्त्वांनाच हरताळ फासणारा आहे.सहकारी संस्थांच्या कायद्यात सलग तीन बैठकांना गैरहजर राहणाऱ्या संचालकांचे सदस्यत्व रद्द करण्याची तरतूद आहे. मात्र, पहिल्याच बैठकीला अनुपस्थित राहणाऱ्या संचालकांना सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्याची राजकीय इच्छाशक्ती सत्ताधारी महायुतीच्या नेतृत्वाने दाखवली नाही. आपले संख्याबळ कमी पडत असल्याचे लक्षात आल्यानंतर राज्य शासनाने या प्रश्नावर वेगळाच मार्ग शोधला. साडेपाचशे कोटी रुपयांपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांवर तज्ज्ञ संचालक नियुक्त करण्याचा अधिकार शासनाने स्वतःकडे घेतला. शासनाला असे अधिकार देण्याचा प्रकार यापूर्वीही घडला आहे. मात्र, यावेळचा विशेष प्रकार म्हणजे या तज्ज्ञ संचालकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. विशेषतः अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार देण्याचा निर्णय वादग्रस्त ठरला.गोकुळची निवडणूक ज्या कायद्याच्या आणि नियमांच्या आधारे पार पडली, त्यानुसार निवडून आलेल्या २५ संचालकांमधून अध्यक्ष आणि इतर पदाधिकाऱ्यांची निवड होणे अपेक्षित आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाने अध्यादेश काढून नव्याने नियुक्त केलेल्या संचालकांना मतदानाचा अधिकार देणे, हा कायदेशीर पेच निर्माण करणारा विषय आहे. कायद्यामध्ये होणारे बदल सामान्यतः भविष्यलक्षी असतात. निवडणूक पार पडल्यानंतर नियम बदलून त्याचा परिणाम सुरू असलेल्या प्रक्रियेवर होणार असेल, तर त्याच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने २५ निवडून आलेल्या संचालकांमधूनच अध्यक्ष निवडण्याच्या प्रक्रियेसंदर्भात आदेश दिल्याचे सांगितले जाते. त्यानंतर शासनाने चार तज्ज्ञ संचालकांची नियुक्ती करून त्यांना मतदानाचा अधिकार दिला. या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. कोल्हापूर परिसरातील या वादाची सुनावणी छत्रपती संभाजीनगर खंडपीठात झाली आणि नव्या संचालकांच्या मतांची स्वतंत्रपणे मोजणी करण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. म्हणजेच त्यांच्या मतांची नोंद होणार, मात्र अंतिम निकालावर त्यांचा परिणाम होणार नाही, अशी व्यवस्था करण्यात आली.मुळात या प्रकरणात न्यायालयासमोर आणखी एक पर्याय होता. संपूर्ण कायदेशीर वादाचा अंतिम निकाल लागेपर्यंत 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा आदेश देता आला असता. मात्र, स्वतंत्र मतमोजणीचा मार्ग स्वीकारल्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. शिवसेनेच्या आमदार अपात्रता प्रकरणातील निकालाची आठवण येथे झाल्याशिवाय राहत नाही. प्रतोद नियुक्तीच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित झाले, मात्र त्याच प्रक्रियेतून निवडून आलेल्या अध्यक्षाच्या अधिकारांबाबत वेगळी भूमिका घेतली गेली. कायद्याचा अर्थ लावताना अशा परस्परविरोधी भूमिका घेतल्या गेल्या तर सामान्य माणसाच्या मनात संभ्रम निर्माण होणारच. न्यायालयाच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे न्यायव्यवस्थेचा अवमान करणे नव्हे. उलट न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ व्हावा, यासाठी प्रत्येक निर्णयामागील कायदेशीर तर्क स्पष्ट असणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांचा कारभार हा राजकीय साठमारीचा आखाडा बनता कामा नये. निवडणुकीत जनतेने किंवा मतदारांनी दिलेला कौल हा महत्त्वाचा असतो. तो कौल बदलण्यासाठी निवडणुकीनंतर नियमांचा आधार घेतला जात असेल, तर सहकारातील लोकशाहीच धोक्यात येईल. गोकुळमध्ये नेमके कोणाचे बहुमत, कोणाचा अध्यक्ष आणि कोणाची सत्ता, हा प्रश्न काही दिवसांत सुटेलही. पण या निमित्ताने उपस्थित झालेला मूलभूत प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. सत्ताधाऱ्यांच्या सोयीने कायद्याचा अर्थ बदलणार असेल आणि न्यायालयीन निर्णयांमुळेही संभ्रम कायम राहणार असेल, तर सामान्य माणसाने न्याय मागायचा तरी कोणाकडे? सहकारातील लोकशाहीला राजकीय सोयीच्या निर्णयांपासून वाचवणे ही आजची गरज आहे. अन्यथा लोकशाहीच्या नावाखाली सुरू असलेला हा सत्तेचा खेळ पाहून एकच म्हणावे लागेल... हा न्याय नव्हे, हा तर अजब न्याय!





मैत्रीच्या दुनियेतील दोन राजे!

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा आणि नव्या आशांचा सण! मात्र यंदाची दिवाळी अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या दुष्काळाच्या सावटाखाली गेली. शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य माणूस संकटांच्या छायेत असताना या दिवाळीत आणखी दोन अशा बातम्या कानावर आल्या की मन सुन्न झाले. आधी किनवटचे ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांच्या दुर्दैवी निधनाची बातमी धडकली आणि त्या धक्क्यातून सावरतो न सावरतो तोच आज सकाळी मित्र गणेश कस्तुरे यानेही जगाचा निरोप घेतल्याची बातमी आली. दोन दिवसांत मैत्रीच्या दुनियेतील दोन राजे काळाने हिरावून नेले. पत्रकारिता क्षेत्राची हानी झालीच; पण त्यापेक्षाही वैयक्तिक आयुष्यातील दोन जिवाभावाचे मित्र गमावल्याचे दुःख अधिक अस्वस्थ करणारे आहे.

प्रदीप वाकोडीकर म्हणजे किनवटच्या पत्रकारितेतील एक ठाम आणि स्पष्ट व्यक्तिमत्त्व! किनवटसारख्या दुर्गम भागात प्रदीर्घकाळ पत्रकारिता करताना त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. मनमिळावू स्वभाव, स्पष्टवक्तेपणा आणि कोणाचीही भीडभाड न ठेवता आपली भूमिका मांडण्याची हिंमत हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांची भूमिका एखाद्याला पटो अथवा न पटो, मात्र त्या भूमिकेमागची भूमिका आणि पार्श्वभूमी समजून घेण्याची ताकद त्यांच्या लेखणीत होती. विशेष म्हणजे, एखाद्याचे चांगले काम दिसले तर त्याचे दिलखुलासपणे कौतुक करण्याचा मोठेपणा त्यांच्यात होता. पत्रकारितेत विरोधक निर्माण होतात; पण मनात कटुता न ठेवता माणसांशी मैत्री जपण्याची कला त्यांना अवगत होती. एका छोट्याशा अपघाताने असे व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून जावे, ही कल्पनाच मनाला चटका लावणारी आहे. प्रदीप वाकोडीकर यांच्या निधनाच्या धक्क्यातून सावरत असतानाच गणेश कस्तुरेच्या जाण्याची बातमी आली आणि मनाचा बांधच फुटला. गणेश म्हणजे कष्टाला कवटाळून आनंदाने जगणारा, प्रत्येक परिस्थितीत हसतमुख राहणारा आणि मैत्रीला जीवापाड जपणारा पत्रकार मित्र! त्याच्या लेखणीतून मोत्यांसारखी शब्दरचना उतरायची. एखाद्यावर टीका करायची तर कोणतीही भीडभाड न ठेवता परखडपणे करायची आणि एखाद्याचे कौतुक करायचे तर अगदी मनापासून, जीवापाड करायचे. हा त्याचा स्वभाव होता.गणेशसोबत अनेक ठिकाणी प्रवास करण्याचा योग आला. प्रवासात गणेशसारखा मित्र सोबत असेल तर कितीही लांबचा प्रवास असला तरी कँटाळा येत नसे. त्याच्या गप्पा, विनोद, निरीक्षणे आणि प्रसंगानुरूप मारलेल्या कोट्या यामुळे प्रवास कधी संपायचा हे कळतही नसे. मैत्री म्हणजे केवळ एकत्र फिरणे नव्हे, तर एकमेकांच्या सहवासात आयुष्याचे ओझे हलके करणे असते, हे गणेशकडून शिकावे. गणेशचा जीवनप्रवासही संघर्षातून घडलेला होता. सुरुवातीच्या काळात ऑटो चालवून उदरनिर्वाह करणाऱ्या या जिद्दी माणसाने कष्टाच्या बळावर स्वतःचे वैभव निर्माण केले. त्यानंतर सामना दैनिकात काम करत पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला. पुढे महाराष्ट्र टाइम्स आणि लोकसत्तासारख्या प्रतिष्ठित दैनिकांसाठी बातमीदार म्हणून काम करत आपल्या लेखणीचा ठसा उमटवला. परिस्थितीपुढे हार न मानता स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या आणि मेहनतीच्या जोरावर उभे राहता येते, याचे गणेश हे जिवंत उदाहरण होते.माणूस किती मोठा झाला यापेक्षा तो किती माणसे जोडून गेला, हे त्याच्या जाण्यानंतर समजते. प्रदीप आणि गणेश या दोघांनीही माणसे जोडली, मैत्री जपली आणि आपल्या स्वभावाने अनेकांच्या मनात घर केले. आज दोघेही आपल्यात नाहीत. त्यांच्या आवाजातील गप्पा नाहीत, अचानक होणारे फोन नाहीत, प्रवासातील सोबत नाही आणि भेटल्यावर होणारा तो मनमोकळा संवादही नाही. उरल्या आहेत त्या फक्त आठवणी!दिवाळीच्या प्रकाशपर्वात आयुष्यातील दोन दिवे असे अचानक विझावेत, यापेक्षा दुर्दैव ते काय? काळाच्या या क्रूर आघातापुढे आपण हतबल आहोत. पत्रकारितेच्या दुनियेत अनेक पत्रकार येतील, जातील; पण प्रदीप वाकोडीकर आणि गणेश कस्तुरे यांच्यासारखी माणसे पुन्हा पुन्हा निर्माण होत नाहीत. त्यांच्या लेखणीची धार, स्वभावातील स्पष्टपणा आणि मैत्रीतील जिव्हाळा कायम स्मरणात राहील. मैत्रीच्या दुनियेतील हे दोन राजे आज आपल्यात नाहीत; पण त्यांनी दिलेला आनंद, सोबत केलेले प्रवास आणि मनात जपलेल्या आठवणी कधीच संपणार नाहीत. काही माणसे शरीराने दूर जातात, पण मनातून कधीच जात नाहीत. प्रदीप आणि गणेश, तुम्ही दोघेही आमच्या आठवणींच्या दुनियेत कायम जिवंत राहाल. अलविदा मित्रांनो... भावपूर्ण श्रद्धांजली!

प्रदीप नागापूरकर
माजी अध्यक्ष,नांदेड जिल्हा
मराठी पत्रकार संघ,नांदेड.

ऋतुचे रंग सणाचे तरंग कार्यक्रमाला रसिकांचा उत्सफूर्त प्रतिसाद

नांदेड/प्रतिनिधी-पत्रकार विजय जोशी निर्मित ऋतुचे रंग, सणाचे तरंग हा गुढीपासून होळीपर्यंत उत्सवांची स्वरयात्रा दर्शविणारा अनोखा कार्यक्रम आज नांदेडच्या बंदाघाटवर दिवाळी पहाटच्या निमित्ताने रंगतदार ठरला. स्टार प्रवाहाच्या कोण होणार छोटे उस्ताद या कार्यक्रमात व्दितीय पुरस्कार मिळविणाऱ्या नायगावच्या वीरा हाक्के, संगीत दिग्दर्शक अमोल मालेगावकर, पत्रकार विजय जोशी यांच्या वेगवेगळ्या रचनामुळे दिवाळी पहाटचा हा दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम रसिक-प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतला. गेल्या तेरा वर्षातील गर्दीचे सर्व विक्रम आज नांदेडकरांनी मोडले.

गुरुव्दारा बोर्ड, नागरीक सांस्कृतिक समिती आणि अशोकनगर गृहनिर्माण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवशीय दिवाळी पहाटची आज सांगता झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या हस्ते झाले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, संयोजन समितीतील सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. विशेष म्हणजे प्रख्यात गझलकार बापू दासरी यांच्या बहारदार आणि नेटक्या संचलनाने या कार्यक्रमात आणखीनच रंगत चढली. उत्कृष्ट कार्यक्रमाचे नियोजन करणाऱ्या ॲड.गजानन पिंपरखेडे यांची या कार्यक्रमाची संकल्पना होती. कोण होणार छोटे उस्ताद या स्टार प्रवाहावर गाजलेल्या कार्यक्रमात सबंध देशभरातून व्दितीय क्रमांक मिळविलेल्या नऊ वर्षीय वीरा हाक्के हिने रसिक, प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. आधी गणाला रणी आणला, या विठूचा गजर हरिनामाचा, बाजेरे मुरलीया, अंबाबाई लाड लाड, आली माझ्या घरी हि दिवाळी, खेळताना रंग बाई होळीचा, हे गाव लय न्यारं, बुगडी माझी सांडली गं, फड सांभाळ तुऱ्याला गं आला या एकापेक्षा एक सरस गाण्याने या नायगावच्या बाल कलाकाराने धमाल उडवून दिली. संगीत दिग्दर्शक अमोल मालेगावकर यांनी माय बाप स्वामी माझे, मुरलीवर माझा, भलगरी दादा, बजाओ ढोल स्वागत मे या वैशिष्ट्यपूर्ण रचना सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले.

पत्रकार विजय जोशी यांनी उठ पंढरीच्या राया, जिवा शिवाची बैलजोड, वाट दिसू दे गा देवा हि गाणी सादर करुन जोशपूर्ण वातावरण तयार केले. माधुरी पाटील वाकोडकर हिने शंभो शंकरा, रुणझुणू त्या पाखरा, आज लक्ष्मीचं रुप हि गिते सादर करुन कार्यक्रमात रंगत आणली. उन्मनी डुघरेकर (बोरीकर) हिने गायिलेल्या अशी चिक मोत्याची माळ, नवरात्रीला नवरुपे हि गाणी सादर करुन कार्यक्रमात वेगळा रंग भरला. प्रख्यात गायक विजय बंडेवार यांनी फिरत्या चाकावरती देशी हे गीत सादर केले तर अभिनव पाटील यांनी हरी म्हणा तुम्ही गोविंद म्हणा हे भक्तीगित सादर केले. गणेश हाक्के यांनी महाराष्ट्र गीत सादर करुन कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमाला संगीत साथ गजानन कुलकर्णी, कृष्णा बोंम्पीलवार, रविराज भद्रे, राज लांबटिळे, आदित्य डावरे यांनी केली. यावेळी आमदार हेमंत पाटील, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी नांदेडच्या नागरिकांना दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ठेवण्यात आलेल्या मदत पेटीत भरीव मदत करण्याचे आवाहन करुन दिपावलीच्या रसिक, प्रेक्षकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शंतनू डोईफोडे, ॲड.गजानन पिंपरखेडे, बापू दासरी, लक्ष्मण संगेवार, वसंत मैया, विजय होकर्णे, चारुदत्त चौधरी, पुरुषोत्तम जोशी, अशोकनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे आनंद जवादवार, गिरीश देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७२६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०६/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सिताराम कचरु सरोदे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **८५/२** गट क्र.-- वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मयत नामे कचरु मल्हारी सरोदे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- मान्यनिय न्यायालयाचे वारसा पत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्रकाश सरोदे, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- बोळ, दक्षिणेस :- मोतीराम ईश्वर सरोदे

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७२६/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०६/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **रुबीना बेगम अ.मोहम्मद अश्फाख** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **१० व ११** गट क्र.**६०६** प्लॉट क्र.**१० व ११** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **इम्तीयाझ बेगम अ.सय्यद मजहरअली** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १४८९/२०२६ दि.०४.११.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- २० फुट रोड, पश्चिमेस :- प्लॉट क्र.०७ व ०८ चा भाग, उत्तरेस :- प्लॉट क्र.११ चा भाग, दक्षिणेस :- २५ फुट रस्ता

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७२४/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०६/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **तानाजी मुंजाजी आव्हाड** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **४८२/२** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **मयत नामे मुंजाजी तातेराव आव्हाड** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- शपथपत्र/संमतीपत्र/हक्कसोडपत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या -- वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- कामाजी साखरे यांचे घर, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- हरी बारसे यांचे घर, दक्षिणेस :- विलास मोटरवार यांचे घर

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७२३/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०६/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **बालाजी नारायण खंडागळे** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **जुने ३३९२, २/५०९ पैकी भागावर व १२३०, ३/९६३ पैकी भागवर** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **नारायण मुंजाजी खंडागळे** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- मान्यनीय न्यायालयीन तडजोडपत्र/शपथपत्र, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

मालमत्ता क्रमांक जुने ३३९२,२/२०५ पैकी उत्तरेकडील बाजु

पुर्वेस :- रमेश व गणेश बालाजी खंडागळे यांचे घर, पश्चिमेस :- सटवाजी खंडाळे यांचा हिस्सा, उत्तरेस :- सार्वजनीक रस्ता, दक्षिणेस :- निवृती लोणे यांची शाळा

मालमत्ता क्रमांक जुने पैकी १२३०,३/९६३ पुर्वेकडील बाजु

पुर्वेस :- रोड (रस्ता), पश्चिमेस :- विश्वनाथ वाघमारे यांचे घर, उत्तरेस :- गंगाराम वाघमारे यांचे घर जागा, दक्षिणेस :- सटवाजी नारायण खंडागळे यांचा हिस्सा

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

नगर पंचायत,अर्धापूर

जा.क्र.१७२५/अ.न.प./नाव परिवर्तन विभाग
नगर पंचायत,अर्धापूर दि.०६/११/२०२६

जाहीर सुचना

(म.न.प.न.पं.व.औ.न.अधिनियम १९६५ चे कलम १२९ व १३० अन्वये)

या जाहिर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **रियाज अहेमद खुरेशी मोईनोदीन खुरेशी** यांनी नगर पंचायतच्या अभिलेखातील मालमत्ता क्रमांक **६५६/१०७** गट क्र.**६६२** प्लॉट क्र.**१०७** वरील नाव बदल करणे **दि. / /२०२६** रोजी उक्त कलमाद्वारे विहित नमुन्यात मुख्याधिकारी नगर पंचायत अर्धापूर यांना लेखी नोटीस दिली आहे. सदर मालमत्ता **सय्यद मजहरअली पि. सय्यद साहेबअली** या नावे असुन यांचे कडून खालील दस्ताऐवजान्वये हास्तांतरण करुन घेतली आहे.

१) खरेदी खत :- १४८८/२०२६ दि.०४.११.२०२६, २) बक्षीस पत्र :- ३) वारसा हक्क :- ४) वाटणी पत्र :- ५) इतर :-

उपरोक्त मालमत्ता ही नगर पंचायतीच्या अर्धापूर वार्डातील -- नगर/गल्ली मधील असून त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- अ.बारी यांचे शेत, पश्चिमेस :- २५ फुट रस्ता, उत्तरेस :- प्लॉट क्र.१०६, दक्षिणेस :- प्लॉट क्र.०८

उपरोक्त मालमत्तेच्या हस्तांतरणा बाबत कांही आक्षेप/उजर असेल तर त्यांनी ही जाहीर सुचना नगर पंचायत कार्यालयातील सुचना फलक, संबंधित मालमत्ता व वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या पासून १० दिवसाच्या आत आपला आक्षेप/उजर सक्षम लेखी पुराव्यासह मुख्याधिकारी न.प.अर्धापूर यांच्या नावे दाखल करावा. मुदतीत आक्षेप/उजर दाखल झाले नसल्यास सदर हस्तांतरण बाबत कायदे नुसार कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत,अर्धापूर

जाहीर प्रगटन

४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांचे न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४९५/२०२६
सुहाना विरुद्ध आयुक्त

अर्जदार : सुहाना V/G राजूमिया शेख वय ४१ वर्ष धंदा मजुरी रा. नांदेड ता.नांदेड जि.नांदेड

गैरअर्जदार : आयुक्त महानगरपालिका

दावा : जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सुहाना V/G राजूमिया शेख वय ४१ वर्ष, धंदा मजुरी रा.रहिमपूर, नांदेड ता.जि.नांदेड याने या न्यायालयात त्यांचे मुलगी नामे सुहाना यांच्या जन्म नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने सुहाना याचा जन्म दिनांक २४/११/२००९ रोजी मौजे नांदेड येथे झाला असे नमुद केले आहे.

तरी अर्जदाराला सुहाना पि.राजूमिया शेख यांचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक २१/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०५.११.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
लिपीक
४ थे फौजदारी न्यायालय,
नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय,नांदेड

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

जबरी चोरी व दुचाकी चोरी करणाऱ्या दोन गुन्हेगारांना पोलीसांनी केली अटक


सहा लाख रुपयांचा ऐवज जप्त



नांदेड/प्रतिनिधी-नागरीकांना खंजरचा धाक दाखवून लुटणाऱ्या व दुचाकी चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली आहे. आरोपींनी आठ गुन्ह्याची कबुली दिली असून पोलीसांनी त्यांच्या जवळून चोरीच्या सहा दुचाकी जप्त केल्या आहेत.

चैतन्यनगर रोडवर एकाच दिवशी मारहाण करुन पाच जणांना लुटल्याची घटना घडली होती. याप्रकरणी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी एका अल्पवयीन बालकास अटक केली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले व त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकाऱ्यांचे एक पथक आरोपींचा शोध घेत होते. फौजदार मिलिंद सोनकांबळे व पोलीस कर्मचारी सोमवारी नांदेड शहरात गस्त घालीत असतांना जबरी चोरी व दुचाकी चोरीच्या घटनेतील दोन आरोपी हे बोंढार हवेली भागात दुचाकी विक्री करण्यासाठी थांबले असल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी सायंकाळी बोंढार हवेली भागातील शेताच्या ऊसा जवळ सापळा रचून अमेरखान उर्फ एमके उर्फ जिहादी महेफु जखान (वय २३) रा.इरफाननगर, गाडेगाव रोड,नांदेड, शेख रिहान उर्फ चिल्ला शेख महेबुब (वय १९) रा.मिल्लतनगर,नांदेड यांना अटक केली. दोन्ही आरोपींनी आपले इतर साथीदार ऋषी वाठोरे, शेख गौस आणि कुणाल आंदे यांच्यासोबत दोन जबरी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तसेच दोन्ही आरोपींनी नांदेड, नरसी, बडुरफाटा, खुदबेनगर, कामठा, माळटेकडी अशा ठिकाणाहून दुचाकी चोरी केल्याचे पोलीसांना सांगितले. पोलीसांनी विविध ठिकाणाहून सहा दुचाकी जप्त केल्या आहेत.

एसटीच्या महिला सवलतीचा गोंधळ! मुदतवाढीची माहितीच वाहकाला नाही



माहूर/प्रतिनिधी-राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांना सवलतीच्या दरात तिकीट मिळावे, यासाठी राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड (एनसीएमसी) नोंदणी अनिवार्य करण्याच्या निर्णयाला शासनाने ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र, या मुदतवाढीच्या निर्णयाची माहिती एसटीच्या वाहकांपर्यंतच पोहोचली नसल्याचा प्रकार समोर आला आहे. परिणामी, महिला प्रवाशांना सवलतीऐवजी पूर्ण तिकीट दर आकारले जात असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

नागपूर ते माहूर या मार्गावरील एमएच १४ एमएच ९३२७ क्रमांकाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या मोनाली आशिष पाठरावे यांना या प्रकाराचा अनुभव आला. नागपूर ते वर्धा प्रवासासाठी त्यांच्याकडून सुरुवातीला १५० रुपये पूर्ण तिकीट दर आकारण्यात आला. याबाबत त्यांनी वाहकाकडे विचारणा केली असता, एनसीएमसी नोंदणीच्या मुदतवाढीबाबत कोणत्याही सूचना प्राप्त झालेल्या नसल्याचे वाहकाने सांगितले. इतकेच नव्हे, तर मुदतवाढीची माहिती खोटी असावी, अशी शंकाही त्याने व्यक्त केली.मात्र, प्रवाशांनी याबाबत ठामपणे विचारणा केल्यानंतर वाहकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. त्यावेळी मुदतवाढ देण्यात आल्याची बाब स्पष्ट झाली. त्यानंतर संबंधित महिला प्रवाशांना सवलतीनुसार रुपयांचे तिकीट देण्यात आले आणि अतिरिक्त आकारलेले पैसे परत करण्यात आले. सध्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी बसमधून महिला प्रवाशांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू आहे. अशा गर्दीच्या काळात शासनाच्या निर्णयाची माहितीच वाहकांना नसणे, हा प्रशासकीय समन्वयाचा प्रश्न उपस्थित करणारा प्रकार आहे. एका जागरूक प्रवाशाने विचारणा केल्यानंतर अतिरिक्त पैसे परत मिळाले; मात्र माहिती नसलेल्या किंवा विचारणा न करणाऱ्या किती महिला प्रवाशांना पूर्ण तिकीट काढावे लागत असेल, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. शासनाने सवलतीच्या योजनेला मुदतवाढ दिली असताना त्याची अंमलबजावणी तळागाळापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी परिवहन महामंडळाची आहे.

कालव्याचे पाणी करखेली तलावात सोडण्यासाठी 'रास्ता रोको' आंदोलन



धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुक्यातील करखेली येथील मालगुजारी तलावात इसापूर धरणाच्या उजव्या कालव्याचे पाणी तातडीने सोडावे, या मागणीसाठी काल करखेली फाट्यावर ३ तास तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले.चार गावांमधील शेकडो संतप्त नागरिक रस्त्यावर उतरल्याने काही काळ परिसर गजबजला आणि वातावरण कमालीचे तणावपूर्ण बनले होते. मात्र, प्रशासनाने लवकरच पाणी सोडण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

तालुक्यातील करखेली, बाभुळगाव, पांगरी आणि जुन्नी या चार गावांना करखेली येथील मालगुजारी तलावातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. या भागात खडकाळ परिस्थिती असल्याने यंदा पाऊस कमी पडल्याने तलाव कोरडा पडण्याच्या मार्गावर आहे. मानवासह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शेजारीच इसापूर धरणाचा उजवा कालवा वाहत असतानाही गावांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. मौ. बाचेगाव आणि राजापूर या गावाची परिस्थिती अशीच बिकट आहे. करखेली येथील युवा नेतृत्व रघुनाथ टेकुलवार यांनी चारही गावांतील नागरिकांची बैठक घेऊन २९ ऑक्टोबर २०२६ आणि ६ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना निवेदने दिली होती. मात्र, कालव्याची पाणी पाळी सुरू असतानाही या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याने अखेर ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मौ. करखेली फाट्यावर आंदोलनाला सुरुवात झाली. या आंदोलनात युवा नेते कैलास भाऊ गोरठेकर यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या धडाडीच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकभर रस्त्यात ठाण मांडून बसले.या आंदोलनात रघुनाथ टेकुलवार, मोहम्मद मोहीजोदिन बिडीवाले, व्यंकटराव पाटील बाभुळगावकर, दत्तू रेड्डी, चंद्रकांत वाघमारे, तुकाराम खांडरे, काशिनाथ कुलकर्णी, पेठकर बालाजी गुरुजी, विजय भंडारे, सुभाष लोखंडे, शिवाजी पाटील, विनोद खंडे, शेख वाशिक यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ऐन दिवाळीत मरखेलचे रेशन लाभार्थी हक्काच्या धान्यापासून वंचित

देगलूर/प्रतिनिधी-महाराष्ट्राचा सर्वात मोठा आणि आनंदाचा सण मानल्या जाणाऱ्या दिवाळीच्या तोंडावर देगलूर तालुक्यातील मरखेल येथील शेकडो गरीब व गरजू शिधापत्रिकाधारकांवर हक्काच्या धान्यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. येथील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ५९ च्या चेअरमनने अद्यापही तहसील कार्यालयात धान्याचे चलन भरलेले नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दुकानदाराच्या या मनमानी कारभाराकडे पुरवठा विभागाचेही सर्रास दुर्लक्ष होत असल्याने संतप्त नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या सबंध महाराष्ट्रामध्ये शेतकरी तथा नागरिक दुष्काळाने होरपळून निघत असताना जो आधार स्वस्त धान्य दुकान्याकडून गरिबांना मिळत असतो त्यालाच हरताळ फासला जात असून नागरिकांची थेट जिवासी खेळण्याचा प्रकार मरखेल येथील स्वस्त धान्याच्या दुकानदाराकडून दिसून येत आहे. शासनाकडून दरवर्षी दिवाळीनिमित्त दिला जाणारा 'आनंदाचा शिधा' आणि नियमित अन्नधान्याचा पुरवठा वेळेत न झाल्यामुळे गरीब कुटुंबांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.रेशन दुकानांवर चकरा मारूनही नागरिक रिकाम्या हाती घरी येत आहेत. स्वस्त धान्य दुकानांमध्ये मात्र अन्नधान्याचा खडखडाट पाहायला मिळत आहे. गोडधोड करण्यासाठी लागणारे तेल, साखर, रवा आणि डाळी तर दूरच, पण नियमित मिळणारे गहू आणि तांदूळ मिळवण्यासाठीही नागरिकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. अनेक ठिकाणी रेशन दुकानदारांकडून अजून पुरवठा आलेला नाही, असे सांगून नागरिकांना परत पाठवले जात असल्याने महिला वर्गातून संताप व्यक्त होत आहे.

आनंदाचा शिधा फक्त कागदावरच?

शासनाने मोठ्या थाटामाटात दिवाळीनिमित्त अत्यंत माफक दरात आनंदाचा शिधा देण्याची घोषणा केली होती. यामध्ये साखर, तेल, चणाडाळ आणि रव्याचा समावेश असतो. परंतु, प्रत्यक्ष जमिनीवर परिस्थिती वेगळीच आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये अजूनही या स्वस्त धान्याचे वाटप सुरू झालेले नाही. असे नागरिकांतून बोलले जात असले तरी काही ठिकाणी अपुऱ्या पुरवठ्यामुळे केवळ मोजक्याच काही गावांतील नागरिकांना याचा लाभ मिळाला आहे. काळ्या बाजाराची भीती आणि प्रशासनाचे दुर्लक्ष एकीकडे सरकारी गोदामांमध्ये धान्य पडून असल्याच्या चर्चा आहेत, तर दुसरीकडे ते वेळेत दुकानांपर्यंत पोहोचत नसल्याने वाहतूक व्यवस्थेतील त्रुटींसोबतच काळ्या बाजाराची शक्यता नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या गंभीर मुद्द्यावर तात्काळ लक्ष देऊन शिधा लोकांपर्यंत कशा पद्धतीने पोहोचवता येईल याची तात्काळ गंभीर्याने दखल घेणे हेही तितकेच महत्त्वाचे.

जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील श्रीमती के.एच.लोहगांवकर, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अर्धापुर यांच्या न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१५३/२०२६
अर्जदार :- विठ्ठल पि.वसंतराव मस्के वय-३३ वर्षे,धंदा-मजुरी रा.मालेगाव ता.अर्धापुर जि.नांदेड
विरूध्द
गैरअर्जदार :- जन्म मृत्यू नोंदणी निबंधक/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मालेगाव ता.अर्धापुर जि.नांदेड
विषय:- जन्म मृत्यू नोंदणी सुधारणा अधिनियम २०२६ कलम १३३ (अ) अन्वये.
ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार विठ्ठल पि.वसंतराव मस्के यांची मुलगी नामे श्रुती पि.विठ्ठल मस्के जन्म दि.०८/०७/२०१८ रोजी राहत्या घरी मालेगाव ता.अर्धापुर जि.नांदेड येथे जन्म झाला आहे. त्यासंबंधीचे कागदपत्र अर्जदाराने प्रकरणात दाखल केले आहेत.
तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांस सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.१४ /१२/ २०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक: ०३/११/२०२६ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अर्धापुर.

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अर्धापुर.

जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील श्रीमती के.एच.लोहगांवकर, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अर्धापुर यांच्या न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१३६/२०२६
अर्जदार :-पुंडलिक पि.मारोती बारसे वय - ४९ वर्षे, धंदा-शेती रा.अर्धापुर ता.अर्धापुर जि.नांदेड.
विरूध्द
गैरअर्जदार :- जन्म मृत्यू नोंदणी निबंधक/मुख्याधिकारी साहेब, नगरपंचायत कार्यालय अर्धापुर ता.अर्धापुर जि.नांदेड.
विषय:- जन्म/मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा २०२६ च्या कलम १३ (अ) अन्वये.
ज्याअर्थी, अर्जदाराने या न्यायालयात मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार पुंडलिक पि.मारोती बारसे यांचे वडील मारोती पि.बापूजी बारसे यांचा मृत्यू दि. १४/०४/२०१८ रोजी राहत्या घरी, मौजे अर्धापुर ता.अर्धापुर जि.नांदेड येथे मृत्यू झाला आहे. त्यासंबंधीचे कागदपत्र अर्जदाराने प्रकरणात दाखल केले आहेत.
तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांस सुचित करण्यात येत आहे की, उपरोक्त अर्जदार यांच्या हक्कात मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अगर उजर असेल तर त्यांनी आपले आक्षेप दि.०३/१२/२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन नोंदवावेत, अन्यथा आक्षेप नाही असे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक : २७/ १०/२०२६ माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अर्धापुर

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,अर्धापुर.

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिमायतनगर यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१०९/२०२६
नवनाथ विरुध्द निबंधक, नगर पंचायत कार्यालय, हिमायतनगर ता.हिमायतनगर
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
अर्जदार :- नवनाथ पि.साहेबराव तवर वय ४१ वर्षे, धंदा-शेती, रा. बोरगाव ता.हिमायतनगर जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार :- निबंधक,
ग्राम पंचायत कार्यालय, बोरगाव ता.हिमायतनगर जि.नांदेड
प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून, त्यांचे म्हणणे आहे की, अर्जदार यांची मुलगी नामे सिद्धिका पि.नवनाथ तवर यांचा जन्म दि.१८/०७/२०११ रोजी मौजे सरसम बु.ता. हिमायतनगर जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.
आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय,हिमायतनगर

जाहीर प्रगटन

श्री.प्रसाद एस.ठाकरे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नायगाव यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२५५/२०२६
शंकर वि.ग्रामविकास अधिकारी
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज
अर्जदार : शंकर पि.गुंडोपंत सुर्यवंशी, वय ५१ वर्षे, धंदा-नौकरी, रा.धुप्पा, ता.नायगाव (खै.),जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय धुप्पा,ता.नायगाव (खै.),जि.नांदेड
प्रकरण : जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,१९६९ अंतर्गत अर्ज
ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी ॲड.एस.एम.रावणगावे यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदाराचा मुलगा सोहम पि.शंकर सुर्यवंशी याचा जन्म दि.१०.०४.२००९ रोजी धुप्पा, ता.नायगाव (खै.), जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.
आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन,
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय,नायगाव बा.

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिमायतनगर यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.११०/२०२६
सत्तार विरुध्द निबंधक, ग्राम पंचायत कार्यालय, सरसम बु.ता.हिमायतनगर
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
अर्जदार :- सत्तार पि.अब्दुल शेख वय ४३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. सरसम (बु.) ता.हिमायतनगर जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार :- निबंधक,
ग्राम पंचायत कार्यालय, सरसम (बु.) ता.हिमायतनगर जि.नांदेड
प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून, त्यांचे म्हणणे आहे की, अर्जदार नामे सत्तार पि.अब्दुल शेख यांचा जन्म दि.१०/०५/ १९८२ रोजी मौजे सरसम बु.ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.
आज दिनांक २८/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय,हिमायतनगर

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिमायतनगर यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१०५/२०२६
जब्बार विरुध्द निबंधक, नगर पंचायत कार्यालय, हिमायतनगर ता.हिमायतनगर
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
अर्जदार :- जब्बार पि.अब्दुल शेख वय ३५ वर्षे, धंदा-वकीली, रा. सरसम बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार :- निबंधक,
ग्राम पंचायत कार्यालय, सरसम बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड
प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून, त्यांचे म्हणणे आहे की, अर्जदाराचे वडील नामे जब्बार पि.अब्दुल शेख यांचा जन्म दि.०५/ ०१/१९९१ रोजी मौजे सरसम बु.ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.
आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय,हिमायतनगर

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिमायतनगर यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१०६/२०२६
कलिम विरुध्द निबंधक, नगर पंचायत कार्यालय, हिमायतनगर ता.हिमायतनगर
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
अर्जदार :- कलिम पि.अब्दुल शेख वय ३२ वर्षे, धंदा-मजुरी, रा. सरसम बु.ता.हिमायतनगर जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार :- निबंधक,
ग्राम पंचायत कार्यालय, सरसम बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड
प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून, त्यांचे म्हणणे आहे की, अर्जदाराचे वडील नामे कलिम पि.अब्दुल शेख यांचा जन्म दि.१०/ ०३/१९९३ रोजी मौजे सरसम बु.ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.
आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय,हिमायतनगर

जाहीर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, हिमायतनगर यांचे न्यायालयात
इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१०७/२०२६
सत्तार विरुध्द निबंधक, नगर पंचायत कार्यालय, हिमायतनगर ता.हिमायतनगर
जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
अर्जदार :- सत्तार पि.अब्दुल शेख वय ४३ वर्षे, धंदा-मजुरी, रा. सरसम बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड
विरुद्ध
गैरअर्जदार :- निबंधक,
ग्राम पंचायत कार्यालय, सरसम बु. ता.हिमायतनगर जि.नांदेड
प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम,२०२६ अंतर्गत अर्ज
ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ यांच्या मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे आहे की, अर्जदाराचे वडील नामे खैरुनबी पि.अब्दुल शेख यांचा जन्म दि.०१/ ०४/१९८६ रोजी मौजे सरसम बु.ता.हिमायतनगर जि.नांदेड येथे झाला आहे. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.
आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय,हिमायतनगर

रेती तस्करीच्या वाहनाने घेतला ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांचा बळी!

प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात किनवटकरांचा संताप



किनवट/प्रतिनिधी-रेतीची तस्करी करणाऱ्या पिवळ्या ट्रॉली ऑटोरिक्षाने स्कुटीला दिलेला जोरदार धक्का ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर (वय वर्ष ७१) यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला. सदरहू दुर्घटना सोमवारी (९ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास किनवट शहरातील अशोक स्तंभावरील सुंदर हॉस्पीटल समोर घडली. त्यांच्या पार्थिवावर किनवटातील कैलास मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. महसूल प्रशासन आणि आरटीओची हप्तेगीरी, पोलीस प्रशासनाचे अशा अवैध धंदेवाल्यांवर अंकुश लावण्यात आलेले अपयश या दुर्घटनेला कारणीभूत ठरले आहे.

किनवट शहरातीलच नव्हे तर अख्ख्या तालुक्यातील अवैध धंद्यांना लगाम घालण्यासाठी लवकरच किनवट तालुक्यातील पत्रकारांचे शिष्टमंडळ महसूल, पोलीस आणि आरटीओ प्रशासनाची भेट घेणार आहेत. चोरटी रेती आणि चोरीच्या मुरुमाची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या धडकेत आणखी किती जणांचे प्राण घेतल्यानंतर स्थानिक महसूल, आरटीओ आणि पोलीस प्रशासनाला अशा धंद्यांना लगाम घालण्यासाठी जाग येणार आहे, असा संतप्त किनवटकरांचा एकमुखी सवाल आहे. ऐन दिवाळीच्या मंगलमय वातावरणाचा या दुर्घटनेने क्षणभरात आनंद हिराऊन घेतला. हा किमान पत्रकारांसाठी तरी काळा दिवस ठरला आहे. प्राप्त माहितीनुसार पत्रकार वाकोडीकर हे सकाळी स्कुटीने सुंदर हॉस्पिटलजवळील त्यांच्या कार्यालयाकडे जात होते. कार्यालयाच्या दिशेने स्कुटी घेत असताना पाठीमागून राँगसाईडने भरधाव येणाऱ्या पिवळ्या ट्रली ऑटोरिक्षा चालकाने सुंदर हॉस्पीटलच्या समोर स्कुटीला जोराचा धक्का दिला. धडकेमुळे वाकोडीकर राष्ट्रीय महामार्गाचे सीसीकरण केलेल्या रोडवर कोसळल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. दरम्यान त्यांना प्राथमिक उपचारासाठी उपस्थितांनी तातडीने स्थानिकच्या साने गुरूजी रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी त्यांना कोठारी येथील सानेगुरुजी मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे डॉ.अशोक बेलखोडे यांनी शर्थीचे प्रयत्न केले मात्र उपचारादरम्यान दुपारी १२ वाजेच्या सुमारास वाकोडीकरांची प्राणज्योत मालवली. हा सर्वांनाच सुन्न करणारा क्षण होता. दुर्घटनेची माहिती मिळताच आमदार भीमराव केराम यांनी रुग्णालयात भेट देऊन वाकोडीकर कुटुंबाचे सांत्वन करून धीर दिला, हे विशेष. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते श्री आयप्पा स्वामी मंदिरापर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागी दुभाजक (डिवायडर) दिलेले आहेत. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते जिजामाता चौक आणि अशोकस्तंभ चौक मार्गे गोकुंदा शहरातील ब.पा. महाविद्यालपर्यंत दुभाजकांची नितांत आणि काळाची गरज असताना देखील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील शाखा अभियंत्यापासून ते मुख्य अभियंत्यांनी जाणीवपूर्वक दुभाजक उभारण्यात टाळाटाळ केलीय. अरुंद रस्ते करून विकास निधीवर हात फिरवल्यांचा लोकांचा आरोप आहे. दुभाजक असते तर वाकोडीकरांचा अपघात टळला असता, अशा संतापजनक प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत.

अर्थखाते राष्ट्रवादीकडेच राहावे-खा.सुनील तटकरे

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा निर्णय सुनेत्रा पवार घेणार!

पुणे:दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेला पुन्हा एकदा वेग आला असताना, या संदर्भातील अंतिम निर्णय पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार घेतील, असे स्पष्ट संकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिले आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार असते, तर दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण पाहता आले असते, असे विधान त्यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्यानंतर आता त्यांनी विलीनीकरणाच्या निर्णयाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्यावर असल्याचे स्पष्ट केले. तसेच राज्याचे अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसकडेच राहावे, अशी आपली ठाम भूमिका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

दिवंगत अजित पवार यांच्या स्मृतीस्थळाला सुनील तटकरे यांनी १० नोव्हेंबर रोजी भेट दिली. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांना दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बोलताना तटकरे म्हणाले की, अशा प्रसंगी कोणतेही राजकीय वक्तव्य करणे योग्य ठरणार नाही. मात्र, विलीनीकरणाचा विषय असेल, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून सुनेत्रा पवार याच याबाबत निर्णय घेतील. शरद पवार यांना देशाच्या राजकारणातील सहा दशकांचा अनुभव आहे. त्यामुळे या विषयासंदर्भात त्यांची भूमिकाही महत्त्वाची असेल. पक्षाच्या अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांच्यावर निर्णय घेण्याची जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्याच्या अर्थखात्याबाबतही सुनील तटकरे यांनी आपली भूमिका ठामपणे मांडली. अजित पवार यांनी राज्याला विक्रमी अर्थसंकल्प दिले. महाराष्ट्राच्या आर्थिक जडणघडणीत आणि विकासाला दिशा देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच २०१० मध्ये आपल्याला राज्याचा ५० वा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली होती. मात्र, अजित पवार यांनी सलग ११ अर्थसंकल्प सादर करून राज्याच्या आर्थिक नियोजनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे अजितदादांच्या पश्चात अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसकडेच राहिले पाहिजे, ही आपली ठाम भूमिका असल्याचे तटकरे यांनी सांगितले. दरम्यान, शरद पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या भेटीसंदर्भातील चर्चेवरही तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली. या भेटीमागे कोणतेही वेगळे राजकीय कारण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक राजकीय भेटीमागे राजकीय अर्थ शोधण्याची आवश्यकता नाही. राजकारणाच्या पलीकडेही काही वैयक्तिक नाती जपावी लागतात, असे ते म्हणाले. आपल्या राजकीय कारकिर्दीत दिवंगत वसंतदादा पाटील, शरद पवार, विलासराव देशमुख आणि अजित पवार यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. या सर्व नेत्यांकडून राजकारणाच्या पलीकडे जाऊन वैयक्तिक नाती कशी जपावीत आणि जोपासावीत, याची शिकवण मिळाली, असेही तटकरे यांनी सांगितले. एकीकडे दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाच्या चर्चांना उधाण आले असताना, दुसरीकडे अर्थखात्यावरून राष्ट्रवादीने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार विलीनीकरणाबाबत काय निर्णय घेतात आणि राज्याच्या मंत्रिमंडळातील खातेवाटपात अर्थखात्याबाबत काय भूमिका घेतली जाते, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादीचे आमदार शरद पवारांना भेटणार

मुंबई/प्रतिनिधी-राज्यात एकीकडे दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा पुन्हा एकदा जोर धरत असताना, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते शरद पवारांची भेट घेत आहेत. अर्थात, प्रकृती अस्वास्थतेबाबत विचारणा करण्यासाठी ही नेतेमंडळी शरद पवारांना भेटत आहेत. मात्र, या भेटीमागे काही राजकीय घडामोडी आहे का, अशी चर्चाही राजकीय वर्तुळात घडत आहे. त्यातच, आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी शरद पवारांच्या भेटीसाठी वेळ मागितल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राष्ट्रवादीच्या आमदारांनी बुधवारी शरद पवारांकडे भेटीसाठी वेळ मागिल्याची सूत्रांची माहिती आहे. नुकतेच पंकज भुजबळ आणि त्यांच्या कुटुंबियांनी देखील शरद पवारांची भेट घेतली होती. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनीही शरद पवारांची भेट घेऊन चर्चा केली होती. त्यावेळी, १० तारखेनंतर तुम्ही पुन्हा भेटा अशी चर्चा दोन नेत्यांमध्ये झाल्याचंही समोर आलं होतं. आता, शरद पवार रुग्णालयातून घरी आले असून सध्या पुढील काही दिवस मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी आराम करणार असल्याची माहिती पवार कुटुंबीयांकडून देण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गेल्याच आठवड्यात विलिनीकरणाबाबत मोठा गौप्यस्फोट केला होता.

दिवाळी पाडव्याची अविस्मरणीय संगीत मेजवानी



नांदेड/प्रतिनिधी-येथे आयोजित रम्य गोदाकाठावर दिवाळी पाडवा पहाट या संगीत कार्यक्रमाला आज उपस्थित राहून मराठी आणि हिंदी गीतांच्या सुरेल मैफलीचा आनंद घेतला.

नांदेड उत्सव समिती, गुरुद्वारा बोर्ड, स्वरसंध्या म्युझिक कल्चर आणि दैनिक गोदातीर समाचार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका मेघा गायकवाड,केशव घोणसे पाटील, दीपक गिरी, शुभम गोसावी, प्रभा पाटकी, अनु नितनवरे आणि शशिकांत जोशी यांनी आपल्या सादरीकरणातून उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.या संगीत सोहळ्याचे संयोजन केशव घोणसे पाटील यांनी केले. त्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या मैफलीमुळे दिवाळी पाडव्याच्या पहाटेला संगीताची विशेष रंगत लाभली.यावेळी सर्व कलाकार, संयोजक आणि आयोजकांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. तसेच उपस्थित रसिकांशी संवाद साधत दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.सुरेल गीतांच्या साथीने अनुभवलेली ही संगीत मैफल दिवाळी पाडव्याच्या आनंदात अविस्मरणीय ठरली!

भानुतीर्थ परिसरात ५५५ दिव्यांचा झगमगाट

नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या पुढाकारातून भव्य दीपोत्सव!

माहूर/प्रतिनिधी-शहरातील भानुतीर्थ परिसरात यंदाची दीपावली मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. नगराध्यक्ष फिरोज भैय्या दोसानी यांच्या पुढाकारातून तब्बल ५५५ दिवे प्रज्वलित करून संपूर्ण परिसर प्रकाशमय करण्यात आला. आकर्षक विद्युत रोषणाई आणि नेत्रदीपक फटाक्यांच्या आतषबाजीने दीपोत्सवाचा आनंद द्विगुणित केला. या नयनरम्य सोहळ्याचा आनंद लुटण्यासाठी वॉर्डातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

एकेकाळी विकासापासून वंचित राहिलेल्या भानुतीर्थ परिसराला यंदा विकासाची आणि प्रकाशाची नवी झळाळी मिळाली. मागील अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांच्या प्रतीक्षेत असलेल्या या परिसराच्या विकासाकडे नगराध्यक्ष फिरोज भय्या दोसानी यांनी विशेष लक्ष दिले. विविध विकासकामांना मंजुरी देत परिसराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यामुळे यंदाची दिवाळी येथील नागरिकांसाठी केवळ सणाचा उत्सव न राहता विकासाच्या नव्या आशेचा आणि आनंदाचा सोहळा ठरली.या विकासकामांसाठी सभापती विजय कामतकर यांनी विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे भानुतीर्थ परिसरातील विकासकामांना गती मिळाली. याच विकासाच्या आनंदाचे प्रतीक म्हणून ५५५ दिव्यांच्या प्रकाशात साजरा झालेला दीपोत्सव नागरिकांसाठी अविस्मरणीय ठरला.या दीपोत्सव सोहळ्याला नगराध्यक्ष फिरोज भय्या दोसानी, उपनगराध्यक्ष नानाभाऊ लाड, सभापती विजय कामतकर, समाजसेवक आकाश कांबडे, सुमित खडसे, विनोद पाटील सूर्यवंशी, सुनील आडे, ज्येष्ठ समाजसेवक मार्गमवर काका यांच्यासह शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि परिसरातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.यावेळी परिसरातील नागरिकांनी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी, सर्व नगरसेवक-नगरसेविका तसेच नगरपरिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले. दिव्यांच्या प्रकाशाने उजळलेला भानुतीर्थ परिसर आणि नागरिकांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे यंदाची दिवाळी माहूर शहरात विशेष चर्चेचा विषय ठरली.



महिलेच्या पर्समधून सोन्याचे मंगळसूत्र लंपास

नांदेड/प्रतिनिधी-महिलेच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे मंगळसूत्र लंपास केल्याची घटना सोमवारी दुपारी जुनामोंढा भागात घडली आहे.

शुभांगी गणेश सूर्यवंशी (वय ३१) रा.अष्टविनायकनगर,नांदेड ह्या सोमवारी दुपारी जुनामोंढा भागातील रबडीवाला दुकानासमोर पाणीपुरी खाण्यासाठी थांबल्या होत्या. अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत शुभांगी सूर्यवंशी यांच्या पर्समधील सोन्याचे मंगळसूत्र शिताफीने चोरुन नेले आहे. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात शुभांगी सूर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस जमादार मरीकुंटलु हे करीत आहेत.

पान १ वरुन

पत्रकार गणेश कस्तुरे...

ज्येष्ठ पत्रकार संजीव कुलकर्णी, संपादक शंतनू डोईफोडे, प्रदीप नागापूरकर, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी गोविंद नांदेडे, व्यंकटेश चौधरी, केशव घोणसे पाटील, बालाजी वैजाळे, चारुदत्त चौधरी यांच्यासह पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी कस्तुरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



कृषि उत्पन्न बाजार समिती धर्माबाद
तर्फे सर्व शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, गुमास्ता
व हमाल बांधवांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभ दीपावली

शेतकरी बांधवांना आवाहन

याद्वारे शेतकरी बांधवांना विनंती पुर्वक कळविण्यात येते की,
१) जर कोणताही आडत्या किंवा व्यापारी बटाव, कट्टी आडत किंवा इतर कोणताही छुपा खर्च आकारुन शेतकऱ्यांची आर्थिक लुट करीत असल्यास तसेच पिवळी पट्टी देण्यास नाकारत असल्यास बाजार समितीला कळवावे. अशी माहिती देणाऱ्या शेतकऱ्याचे नाव उघड करण्यात येणार नाही गुप्त ठेवण्यात येईल याची नोंद घ्यावी व संबंधित आडत्या, व्यापाऱ्याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल.
२) शेतकऱ्यांनी आपला शेतमाल विक्री करण्यापूर्वी शेतमाल वाळवून, सुकवून, स्वच्छ करून आणावा. तसेच खरेदीदार हा धर्माबाद बाजार समितीचा लायसन्सधारक व्यापारी आहे काय याची खात्री करून घ्यावी.
३) शक्यतोवर आपला शेतमाल धर्माबाद मार्केट यार्डातच विक्रीस आणावा, आपला माल विकल्यावर आडत्या किंवा खरेदीदाराकडून न चुकता बाजार समितीची हिशेब पट्टी (पिवळी पावती) घ्यावी.
४) कोऱ्या कागदावर, चिठ्ठी वर अजिबात व्यवहार करु नका. अश्या व्यवहारास बाजार समिती जबाबदार राहणार नाही याची शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी.
५) कृपया अनामत व्यवहार, कंडिशनल व्यवहार करु नका. थोडक्या पैश्याच्या अमिषाला बळी पडून थोडक्या स्वतःची फसवणूक करून घेऊ नका.
६) कृपया बाजार भावाकडे लक्ष ठेवत जा. शेतीमालामध्ये मोठ्या प्रमाणात तेजी मंदी होत असल्यामुळे अनामत व्यवहारातून आर्थिक धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.
७) गेल्यावर्षी अनामत व्यवहार कंडिशनल व्यवहार तसेच कोऱ्या कागदावरील व्यवहार केलेल्या बऱ्याच शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसलेला आहे.
करीता आपण रात्रंदिवस काबाडकष्ट करून पिकविलेल्या मालाला योग्य दाम मिळण्यासाठी आणि अचुक व्यवहार होण्यासाठी कृपया आपण आपला शेतमाल धर्माबादच्या मार्केट यार्डातच विक्रीस आणावा असे आवाहन करण्यात येते.

सि.डी.पाटील, सचिव
अनिल चव्हाण, प्रशासक
कृषि उत्पन्न बाजार समिती धर्माबाद

दीपावली निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
अंजुमन व्यापारी शिक्षण संस्था संचलित,
देगलूर महाविद्यालय,देगलूर
कार्यकारणीची यादी
श्री प्रकाश निवृतीराव पाटील बेम्बरेकर- अध्यक्ष
श्री जनार्धन जयराम चिद्रावार- उपाध्यक्ष
श्री डॉ.कर्मवीर पोशट्टी उनग्रतवार-सचिव
श्री राजकुमार राम महाजन- सहसचिव
श्री विलास शंकरराव तोटावार- कोषाध्यक्ष
श्री. सुर्यकांत गोविंद नारलवार -कार्यकारिणी सदस्य
श्री देवेंद्र बालाजीराव मोतेवार- कार्यकारिणी सदस्य
श्री गंगाधराव यशवंतराव जोशी- कार्यकारिणी सदस्य
श्री रविंद्र काशिनाथअप्पा ध्याडे- कार्यकारिणी सदस्य
श्री चंद्रकांत राजन्ना नारलावार- कार्यकारिणी सदस्य
श्री गुरुराज शशिकांत चिद्रावार- स्विकृत सदस्य
श्री विजय पोशट्टी उनग्रतवार- स्विकृत सदस्य
प्राचार्य डॉ.मोहन ना.खताळ- पदसिद्ध सदस्य

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४